**कृषि समिती सभा जिल्हा परिषद,गोदिया**
**दिनांक २९/१२/२०१७ ची सभा**
**सभेचे कार्यवृत्त**

दिनांक २९/१२/२०१७ ला दु.१२.००वाजता कृषि समिती सभा सन्मा.सौ.छायाताई आत्माराम दसरे सभापती कृषि समीती यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला सभेचे रजिस्टर मध्ये स्वाक्षरी असलेले सन्मा. समिती सदस्य / अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत केले व

सभेला सुरुवात करण्यांत आली.

**विषय क्र.१- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर व कायम करणे**

**ठराव क्र.१-** दिनांक ३०/११/२०१७ रोजी झालेल्या कृषि समिती सभेच्या कार्यवृत्ताच्या प्रति मा. अध्यक्ष व सन्मा. समिती सदस्यांना देवून त्यांचे वाचन करण्यांत आले. कार्यवृत्तावर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत येवून कार्यवृत्तास मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -२ शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे**
**ठराव क्र.- २-** शासनाकडुन योजनाविषयक कोणतेही परिपत्रक शासन निर्णय प्राप्त झालेले नाहीत.
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -३ विविध योजना विषयक आढावा**
**ठराव क्र.- ३-** सन २०१७-१८ मध्ये राबविण्यात येणाऱ्या जिल्हा निधी योजने अंतर्गत योजनेची माहीती तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबण योजना विषयक आढावा सभेत माहिती देण्यात आले.
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र -४ कृषि प्रदर्शनी/शेतकऱ्यांचा सत्कार समारंभ**

**ठराव क्र.-** ४ सन २०१७-१८चे जिल्हानिधी अंदाजपत्रकात कृषि प्रदर्शनी/शेतकऱ्यांचा सत्कार समारंभ या बाबीवर रुपये ३.०० लक्षची तरतुद उपलब्ध असुन सदर तरतुदी मधुन तालुकास्तरावर कृषि प्रदर्शनी/शेतकऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यासाठी सभेत चर्चा करण्यात आली. जिल्हयातिल आठ पंचायत समीतींना कृषि प्रदर्शनी/शेतकऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यासाठी उपलब्ध तरतुदीमधुन सारख्याप्रमाणात अनुदान वाटप करण्यात यावे व खर्च करण्यास

सवार्नुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -५ बियाणे खते यांचे गुणवंत्ता तपासणीसाठी नमुने काढण्यांकरीता कापड खरेदी करणे**

**ठराव क्र.- ५** जिल्हयातिल शेतकऱ्यांना योग्य दर्जाची/गुनवंत्तेचे बियाणे व खते किटकनाशके उपलब्ध व्हावी या दृष्टीने त्यांची गुणवंत्ता तपासणी करीता खाजगी कृषि केंद्रावरुन नमुने काढणे व प्रयोग शाळा तपासणीसाठी पाठविण्याकरीता कापडी पिशवीची अत्यंत आवश्यकता असते. याकरीता रु.२००००/- हजाराची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेले असुन यामधुन कापडी पिशवी तयार करण्याकरीता येणाऱ्या खर्चास समीती सभेने सवार्नुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.

**विषय क्र. - ६ मा.अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**ठराव क्र.- ६** मा.अध्यक्षांचे परवानगीने येणारे विषयात एकही ठराव नसल्याने ठराव घेण्यात आलेले नाही.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सभेस उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्ष महोदयाचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| सदस्य सचिव<br>कृषि समिती तथा<br>कृषि विकास अधिकारी,<br>जिल्हा परिषद, गोंदिया | अध्यक्ष<br>कृषि समिती तथा<br>सभापती कृषि समिती<br>जिल्हा परिषद, गोंदिया |

**कृषि समिती सभा जिल्हा परिषद,गोंदिया**
**दिनांक २५/०१/२०१७ ची तहकुब सभा**
**दिनांक २२/०२/२०१८ सभेचे कार्यवृत्त**

दिनांक २५/०१/२०१७ ला कृषि समिती सभा आयोजित करण्यात आली होती. सभा कोरम अभावी तहकुब झाल्याने ती सभा दिनांक २२/०२/२०१८ ला दु. ४.०० वाजता सन्मा.सौ. सिमाताई विलास मडावी अध्यक्ष जिल्हा परिषद गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला सभेचे रजिस्टर मध्ये स्वाक्षरी असलेले सन्मा. समिती सदस्य/अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत केले व सभेला सुरुवात करण्यांत आली.

**विषय क्र.१- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर व कायम करणे**

**ठराव क्र.१-** दिनांक २९/१२/२०१७ रोजी झालेल्या कृषि समिती सभेच्या कार्यवृत्ताच्या प्रति मा. अध्यक्ष व सन्मा. समिती सदस्यांना देवून त्यांचे वाचन करण्यांत आले. कार्यवृत्तावर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत येवून कार्यवृत्तास मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -२ शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे**

**ठराव क्र.- २-** शासनाकडुन योजनाविषयक कोणतेही परिपत्रक शासन निर्णय प्राप्त झालेले नसल्याने वाचन करता आले नाही.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -३ विविध योजना विषयक आढावा**

**ठराव क्र.- ३-** सन २०१७-१८ मध्ये राबविण्यात येणाऱ्या जिल्हा निधी योजने अंतर्गत योजनेची माहीती तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबण योजना व बिरसा मुंडा कृषि क्राती योजने विषयक सभेत माहिती देण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -४ मा.अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**ठराव क्र.-** ४ मा.अध्यक्षांचे परवानगीने येणारे विषयात एकही ठराव नसल्याने ठराव घेण्यात आलेले नाही.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सभेस उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्ष महोदयाचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

स्वा/-
सदस्य सचिव
कृषि समिती तथा
कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

स्वा/-
अध्यक्ष
जिल्हा परिषद, गोंदिया

**कृषि समिती विशेषसभा जिल्हा परिषद,गोंदिया**
**दिनांक २८/०२/२०१८ ची विशेषसभा**
**सभेचे कार्यवृत्त**

दिनांक २८/०२/२०१८ ला दुपारी २.००वाजता कृषि समिती विशेष सभा सन्मा.सौ.शैलजा कमलेश सोनवाने सभापती कृषि समीती यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला सभेचे रजिस्टर मध्ये स्वाक्षरी असलेले सन्मा. समिती सदस्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत केले व सभेला सुरुवात करण्यांत आली.

**विषय क्र.१- सन २०१७-१८चे सुधारित अंदाजपत्रक व २०१८-१९ चे संभाव्य अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याबाबत.**

**ठराव क्र.१-** सन २०१७-१८ चे सुधारित अंदाजपत्रक व २०१८ चे संभाव्य अंदाजपत्रक तैयार केले असुन सभे समोर ठेवुन त्याचे सविस्तर वाचन करण्यात आले.यावर सभेत चर्चा करुन अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -२ कृषि प्रदर्शनी/शेतकऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करणे.**

**ठराव क्र.-** २ सन २०१७-१८चे जिल्हानिधी अंदाजपत्रकात कृषि प्रदर्शनी/शेतकऱ्यांचा सत्कार समारंभ या बाबीवर रुपये ३.०० लक्षची तरतुद उपलब्ध असुन सदर तरतुदी मधुन तालुकास्तरावर कृषि प्रदर्शनी/शेतकऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यासाठीसभेतचर्चाकरण्यातआली.जिल्हयातिलसालेकसा,आमगांव,तिरोडा,पंचायतसमीतींनाकृषि प्रदर्शनी/शेतकऱ्यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यासाठी उपलब्ध तरतुदीमधुन प्रत्येकी रु.१.०० लक्ष अनुदान वाटपकरण्यात यावे व रु. ३.००लक्षखर्च करण्यास सवार्नुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.

.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. ३-बायोगॅस संयंत्र बांधकाम करणा-या शेतक-यांना जिल्हानिधीतुन प्रोत्साहनपर अनुदान देणे.**

**ठराव क्र.- ३-** सन २०१७-१८ चे जिल्हानिधी अंदाजपत्रकात विषंयाकिंत बाबीवर रु.५.००लक्षची तरतुद उपलब्ध असुन सदर तरतुदी मधुन जिल्हयाला ८३ बायोगसचे उदीष्टे असुन ८३ शेतकरी बायोगॅसचे बांधकाम करणार आहेत.शासकिय अनुदान बायोगॅस बांधकाम करण्यास अपुरे पडत असल्याने जिल्हा निधीतुन बायोगस बांधकाम करणारा प्रति लाभार्थीस रु. ६०००/- प्रोतसाहन पर अनुदान देण्यात यावी.व ८३ लाभार्थी ना मंजुरी देण्यात येत आहे असे सर्वानुमते ठरविण्यात आले.सदर योजना राबविण्यास व योजनेवरिल खर्चास सर्वानु
मते मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सभेस उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्ष महोदयाचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| सदस्य सचिव | अध्यक्ष |
| कृषि समिती तथा | कृषि समिती तथा |
| कृषि विकास अधिकारी, | सभापती कृषि समिती |
| जिल्हा परिषद, गोदिया | जिल्हा परिषद, गोदिया |

**कृषि समिती सभा जिल्हा परिषद,गोंदिया**
**दिनांक २१/०३/२०१८ सभेचे कार्यवृत्त**

दिनांक २१/०३/२०१८ ला दु. १.०० वाजता सन्मा.सौ. शैलजा कमलेश सोनवाने सभापती कृषि समिती जिल्हा परिषद गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला सभेचे रजिस्टर मध्ये स्वाक्षरी असलेले सन्मा. समिती सदस्य/अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत केले व सभेला सुरुवात करण्यांत आली.

**विषय क्र.१- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर व कायम करणे**
**ठराव क्र.१-** दिनांक २९/१२/२०१७ रोजी झालेल्या कृषि समिती सभेच्या कार्यवृत्ताच्या प्रति मा. अध्यक्ष व सन्मा. समिती सदस्यांना देवून त्यांचे वाचन करण्यांत आले. कार्यवृत्तावर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत येवून कार्यवृत्तास मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -२ शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे**
**ठराव क्र.-२-** शासनाकडुन योजनाविषयक कोणतेही परिपत्रक व शासन निर्णय प्राप्त झालेले नसल्याने वाचन करता आले नाही.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -३ विविध योजना विषयक आढावा**
**ठराव क्र.- ३-** सन २०१७-१८ मध्ये राबविण्यात येणाऱ्या जिल्हा निधी योजने अंतर्गत योजनेची माहीती तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबण योजना व बिरसा मुंडा कृषि क्राती योजने विषयक सभेत माहिती देण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -४ मा.अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**
**विषय क्र.- ४/१. खरीप हंगामामध्ये आरगॅनीक औषधाचा वापर करण्याबाबत.**
**ठराव क्र.- ४/१** जिल्हा निधी योजनेतंर्गत पिक संवक्षण औषधे शेतकऱ्यांना खरीप हंगामामध्ये ५० टक्के अनुदावर DBT नुसार वाटप करण्यात येते तसेच शेतकऱ्यांचे भात पिकावर आरगॅनीक औषधाचा वापर करण्यांचे प्रमाण वाढत आहे असे दिसुन येते तरी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी जिल्हा निधीतुन रासायनिक औषधा बरोबर जे शेतकरी आरगॅनीक औषधे वापर करतील त्यांना सुध्दा ५० टक्के अनुदान देण्यात यावे अशी सुचना सन्मानिय सदस्य श्री. दिपक सिंह पवार यांनी केली यावर चर्चा करुन ठरावास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- ४/२. जिल्हा नियोजन विकास मंडळा अतंर्गत सौर उुर्जेवरील तारेचे कुंपनास मंजुरी मिळण्याबाबत.**

**ठराव क्र.-४/२** गोंदिया जिल्हयात बऱ्याचशा भागात शेतीला लागुन जंगल आहेत. शेतात पिक असल्यावर जंगली जनावरे पिकाचे नास-धुस करतात त्यामुळे शेतकऱ्यांचे खुप आर्थिक नुकसान होते. त्याकरिता शेतकऱ्यांच्या शेतावर जंगली प्राणि येवू नये या करिता जिल्हा नियोजन विकास मंडळा अतंर्गत सौर उुर्जेवरील तारेचे कुंपनास मंजुरी मिळण्याबाबत नाविन्यपुर्ण योजना तयार करून जिल्हा नियोजन विकास मंडळाकडे मंजुरी करिता पाठविण्यात यावे. यांस सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सभेस उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्ष महोदयाचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| सदस्य सचिव | अध्यक्ष कृषि समिती तथा |
| कृषि समिती तथा | सभापती |
| कृषि विकास अधिकारी, | कृषि समिती |
| जिल्हा परिषद, गोंदिया | जिल्हा परिषद, गोंदिया |

**कृषि समिती सभा जिल्हा परिषद,गोदिया**
**दिनांक २०/०४/२०१८ सभेचे कार्यवृत्त**

दिनांक २०/०४/२०१८ ला दु. १२.०० वाजता सन्मा.सौ. शैलजा कमलेश सोनवाने सभापती कृषि समिती जिल्हा परिषद गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला सभेचे रजिस्टर मध्ये स्वाक्षरी असलेले सन्मा. समिती सदस्य/अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत केले व सभेला सुरुवात करण्यांत आली.

**विषय क्र.१- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर व कायम करणे**

**ठराव क्र.१-** दिनांक २१/०३/२०१८ रोजी झालेल्या कृषि समिती सभेच्या कार्यवृत्ताच्या प्रति मा. अध्यक्ष व सन्मा. समिती सदस्यांना देवून त्यांचे वाचन करण्यांत आले. कार्यवृत्तावर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत येवून कार्यवृत्तास मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -२ शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे**

**ठराव क्र.-२-** शासनाकडुन योजनाविषयक कोणतेही परिपत्रक व शासन निर्णय प्राप्त झालेले नसल्याने वाचन करता आले नाही.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -३ विविध योजना विषयक आढावा**

**ठराव क्र.- ३-** सन २०१७-१८ मध्ये राबविण्यात येणाऱ्या जिल्हा निधी योजने अंतर्गत योजनेची माहीती तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबण योजना व बिरसा मुंडा कृषि क्राती योजने विषयक सभेत माहिती देण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र. -४ कृषी समिती सभेचा चहा पाण्याचा खर्चास मंजुरी प्रदान करणे**

**ठराव क्र.- ४** जिल्हा निधी अंदाजपत्रकात सन २०१८-१९ मध्ये कृषि समिती सभेवर होणाऱ्या चहा पाण्याचा खर्चासाठी रु. ४००००/- इतकी तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर तरतुदीमध्ये शासनाचे ध्येय धोरणानुसार प्रत्येक मासीक सभेचा खर्च भागवावा असे सर्वानुमते ठरवुन खर्चास मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- ५ कार्यालयीन खर्चास मंजुरी प्रदान करणे**

**ठराव क्र.- ५** जिल्हा निधी अंदाजपत्रकात सन २०१८-१९ मध्ये कृषि विभागातिल कार्यालयीन खर्च भागविण्यासाठी रु.१००००० ची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली असुन, सदर तरतुदीमधुन कार्यालयात लागणारे कार्यालयीन साहित्य, साठा पुस्तके, फाईल्स, स्टेशनरी, निविष्ठा तपासणी लागणारे कागद पत्र,बॅनर्स,रजिस्टर

इत्यादी कामे सदर तरतुदीमध्ये करायची आहे. सदर कामे शासनाच्या ध्येय धोरणानुसार करुन त्यावरिल खर्च उपलब्ध निधीतुन भागविण्यात यावा. सर्वानुमते ठरवुन खर्चास मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- ६ पिक संरक्षण उपयोजना व औषध खरेदीस मंजुरी प्रदान करणे**

**ठराव क्र ६-** जिल्हा निधी योजना सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात पिक संरक्षण उपयोजना व औषधी वाटप करणे १०१-२१/१ या लेखाशिर्षाखाली रु. १०.०० लक्षची तरतुद उपलब्ध आहे. तसेच ५० टक्के लाभार्थी हिस्सा रु. १०.०० लक्ष असे एकुण रु. २०.०० लक्ष सदर तरतदीमधून कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/प्र-क्र-३१/१७-अे दिनांक १९ एप्रिल २०१७ अन्वये किटकनाशके /बुरशिनाशके यांचा पुरवठा वस्तूस्वरुपात करण्यांऐवजी किटकनाशके लाभार्थीनी स्वतः खुल्या बाजारातून खरेदी करुन ५० टक्के रोख स्वरुपात रक्कम लाभार्थीच्या थेट बॅक खात्यात जमा करावयाची असल्याने त्यानुषंगाने (DBT) नुसार कार्यवाही करण्यांत यावे. असे सर्वानुमते ठरविण्यांत आले व सर्वानुमते खर्चास मंजुरी प्रदान करण्यात आली. **ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- ७ बियाणे, खते यांचा गुणवत्ता तपासणीसाठी नमुने काढण्यासाठी लागणरे कापड मंजुरी प्रदान करणे**

**ठराव क्र ७-** जिल्हयातील शेतकऱ्यांना योग्य दर्जाची/गुणवत्तेची बियाणे व खते, किटकनाशके उपलब्ध व्हावी यादृष्टीने त्यांची गुणवत्ता तपासणीकरीता खाजगी कृषि केंद्रावरुन नमुने काढणे व प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यांकरीता कापडी पिशवीची अत्यंत आवश्यकता असते याकरीता रु. २०,०००/- हजाराची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, त्यामधून कापडी पिशवी तयार करणेकरीता येणाऱ्या खर्चास समिती सभेने सर्वानुमते मंजुरी प्रदान केली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- ८ प्रात्यक्षिक व प्रसिध्दी खर्चास मंजुरी प्रदान करणे**

**ठराव क्र. ८** जिल्यातील शेतक-यांना विविध कृषि योजनाची माहीती मिळण्यांचे दृष्टिने सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात रुपये ५०,०००/- ची तरतुद उपलब्ध असून, सदर तरतुदीमधून कृषि विभागामार्फतीने राबविण्यांत येणा-या योजनांचे प्रचार व प्रसिध्दीसाठी योजनेचे डिजीटल बॅनर्स, माहीती पुस्तीका छपाई करण्यात यावे व सदर बॅनर्स प्रसिध्दी करीता जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत कार्यालय येथे लावण्यात यावे असे कृषि समिती सभेत चर्चा करण्यांत आलेली असून असे सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- ९ -५० टक्के अनुदानावर भाजीपाला मिनीकिट पुरविणे**

**ठराव क्र ९-** सन २०१८-१९ मध्ये जिल्हा निधी योजनेतंर्गत ५० टक्के अनुदानावर भाजीपाला मिनीकिट पुरविणे या बाबीवर रु. ४.०० लक्ष ची तरतुद आहे जिल्हयातील शेतकरी भातपिकाची लागवड करत असून पिकात बदल करणे आवश्यक आहे या वर्षी रब्बी हंगामात ज्या शेतकऱ्यांकडे हमखास सिंचनाची सुविधा आहे अशा शेतकऱ्यांना भाजीपाला पिकाचे लागवडीसाठी प्रोत्साहित करण्याचे योजनेत प्रस्तावित आहे. अशा शेतकऱ्यांना जिल्हा निधी योजनेतंर्गत प्रति

शेतकरी अंदाजीत रु.१०००/- पर्यंत भाजीपाला बियाणे ची किट ५० टक्के अनुदानावर दयावयाचे आहे. तरी कृषि समिती सभेत चर्चा करण्यांत आलेली असून सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- १० - शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देणे**

**ठराव क्र १०-** सन २०१८-१९ मध्ये जिल्हा निधी योजनेतंर्गत शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देणे या बाबीवर रु. ४.०० लक्ष ची तरतुद आहे. गोंदिया जिल्हयात भात पिक प्रामुख्याने घेतले जाते खरीब हंगामात या योजनेतंर्गत धान पिकाच्या वेगवेगळया वाढीच्या अवस्थेच्या वेळी शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन तसेच चांगल्या दर्जाचे भात बियाणे तयार करण्यासाठी बिजोत्पादन विषयावर मार्गदर्शन व भाजीपाला लागवड विषय मार्गदर्शन या पंचायत समीती/ जि.प. क्षेत्रनिहाय कार्यशाळा घ्यावयाचे असून या बाबीवर खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- ११ - पिक संरक्षण उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य**

**ठराव क्र ११ -** जिल्हा निधी योजना सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात पिक संरक्षण उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य १०१-३३/६ या लेखाशिर्षाखाली रु. ३.०० लक्षची तरतुद उपलब्ध आहे. तसेच ५० टक्के लाभार्थी हिस्सा रु. ३.०० लक्ष असे एकुण रु. ६.०० लक्ष सदर तरतदीमधून नॅपसॅक स्प्रेंप/रॉकिंग स्प्रेअर, बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप यांचा पुरवठा वस्तूस्वरुपात करण्यांऐवजी स्प्रेंपंप मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना स्वतः खुल्या बाजारातून ISI मार्कसह खरेदी करुन ५० टक्के रोख स्वरुपात रक्कम लाभार्थीच्या थेट बॅक खात्यात जमा करावयाची असल्याने त्यानुषंगाने (DBT) नुसार कार्यवाही करण्यांत यावे. असे सर्वानुमते ठरविण्यांत आले. **ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.- १२- सिंचन पाईप खरेदीसाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य**

**ठराव क्र १२-** जिल्हा निधी मंजुर अंदाजपत्रकात सन २०१८-१९ वर्षाकरीत सिंचन पाईप खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यांचे योजनेसाठी रु. १०.०० लक्षची तरतुद उपलब्ध असून लाभार्थी हिस्सा रु. १०.०० लक्ष असे एकून रु.२०.०० लक्ष ची योजना असून सदर तरतुदीमधून जिल्हयातील शेतकऱ्यांना HDPE वा PVC पाईप ( ISI mark, BSI प्रमाणपत्र, testing प्रमाणपत्र) असलेल्या पाईप खरेदीवर खरेदीवर ५० टक्के अर्थसहाय्य देण्यांची योजना राबविण्याची आहे. सदर योजना शासनाचे ध्येय धोरणानुसार थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजनेच्या निकषानुसार राबविण्यांची असल्याचे कृषि विकास अधिकारी यांनी समिती सभेत सांगीतले.यावर समिती सभेत सविस्तर पुर्वक चर्चा करण्यांत येवून योजना राबविणे व होणाऱ्या खर्चास मंजुरी प्रदान करण्यांत आली. **ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक १३- हिरवळीच्या खताचे बियाणे (ढेंचा) ५० टक्के अनुदानावर वाटप करणे**

**ठराव क्र १३-** सन २०१८-१९ चे जिल्हा निधी मंजुर अंदाजपत्रकात हिरवळीच्या खताचे (ढेंचा) बियाणे ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वाटप करणे याबाबीवर रु १०.०० लक्षची तरतुद उपलब्ध आहे. लाभार्थी हिस्सा १०.०० लक्ष एकून २०.०० लक्ष ची योजना असून हिरवळीच्या खतामुळे जमिणीचा पोत सुधारणा होवून रासायनिक खताची मात्रा फारच अल्प लागते. त्यामुळे शेतकऱ्यांकडून रासायनिक खतावर होणारा जास्तीचा खर्च कमी करता येतो. अशा अत्यंत शेतीपयोगी ढेंचा बियाणे शासन निर्णय प्रमाणे बियाणे उत्पादक करण्यारे शासकिय संस्था महाबिज ,NSC, कृषि विज्ञान केंद्र व कृषि निविष्ठाचे अधिकृत विक्रेते यांच्याकडुन किंवा शासकिय यंत्रणेकडून शेतकऱ्यांनी खरेदी करावयाचा आहे.

योजना शासनाचे ध्येय धोरणानुसार थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजनेच्या निकषानुसार राबविण्यांची असल्याचे कृषि विकास अधिकारी यांनी समिती सभेत सांगीतले.यावर समिती सभेत सविस्तर पुर्वक चर्चा करण्यांत येवून योजना राबविणे व होणाऱ्या खर्चास मंजुरी प्रदान करण्यांत आली. **ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक -१४ शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर ताडपत्रीचे वाटप करणे**

**ठराव क्रमांक १४-** जिल्हा निधी योजना सन २०१८-१९ अंतर्गत कृषि विभागासाठी मंजुर अंदाजपत्रकात शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर ताडपत्री वाटप करणे याबाबीवर रु. १०.०० लक्षची तरतुद उपलब्ध असून लाभार्थी हिस्सा १०.०० लक्ष एकून २०.००लक्ष आहे. सन २०१८-१९ या चालू वित्तीय वर्षात जिल्हा निधी योजनेअंतर्गत जिल्हयातील शेतकऱ्यांनी मागणी केल्यानुसार त्यांना ३०० GSM , ६x६ mtr, ISI Mark या स्पेशिफिकेशन खरेदी करावे असे समितीने ठरविले. सदर योजना जिल्हयात राबविणेसाठी समिती सभेत यावर सविस्तरपुर्वक चर्चा करण्यांत आली व कृषि साहीत्ये खरेदी बाबतच्या (DBT) शासन निर्णयातील अटि/शर्ती व निकषानुसार कार्यवाही करुन सदर बाबीची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना पंचायत समिती स्तरावरुन लाभ देण्यांबाबत तसेच योजना राबविणे व त्यावरील होणाऱ्या खर्चास समिती सभेत सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यांत आली. **ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक १५- ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना भात बियाणे वाटप करणे**

**ठराव क्रं १५:-** सन २०१८-१९ चे जिल्हा निधी अदांजपत्रकात विषयांकित बाबीवर रु.१५.०० लक्षची तरतुद उपलब्ध असुन, लाभार्थी हिस्सा रु. १५.०० लक्ष एकून ३०.०० लक्ष. सदर तरतुदीमधुन जिल्हयातील शेतकऱ्यांचे भात पिक उत्पादनात वाढ व्हावी. व त्यांचे जिवन मान उंचवावे व आर्थिक उत्पन्नात वाढ होण्यांच्या दृष्टिने ५० टक्के अनुदानावर जास्त उत्पादन देणाऱ्या प्रमाणीत भात बियाणे व सत्वता दर्शक जिल्हयातील सर्व साधारण शेतकऱ्यांना १ हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यत वाटप करण्यात यावे असे ठरविले. शासन निर्णय प्रमाणे बियाणे उत्पादक करण्यारे शासकिय संस्था महाबिज ,NSC, कृषि विज्ञान केंद्र व कृषि निविष्ठाचे अधिकृत विक्रेते यांच्याकडुन यासाठी अशा भात बियाणे शेतकऱ्यांनी खरेदी करायचं आहे. प्रमाणीत भात बियाणे व सत्वता दर्शक बियाणे अटी , शर्ती च अधिन राहुन खरेदी करण्यांत यावी. योजना शासनाचे ध्येय धोरणानुसार थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजनेच्या निकषानुसार राबविण्यांची असल्याचे कृषि विकास अधिकारी यांनी समिती सभेत सांगीतले.यावर समिती सभेत सविस्तर पुर्वक चर्चा करण्यांत येवून योजना राबविणे व होणाऱ्या खर्चास मंजुरी प्रदान करण्यांत आली. **ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र.१६- जुर्ले कृषि दिन साजरा करणेबाबत.**

**ठराव क्र १६-** सन २०१८-१९ जिल्हा निधी अंदाजपत्रकात कृषि विभागाकरीता मंजुर बाबीनुसार १ जुर्ले हा दिवस महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांची जयंती निमित्ताने कृषि दिन साजरा करणेकरीता रु. ५०,०००/- ची तरतुद उपलब्ध करुन देण्यांत आलेली असून शासनाचे ध्येय धोरणानुसार सदरचा कार्यक्रम घेणेसाठी प्रत्येक पंचायत समिती स्तरावर रु. १५००/- व उर्वरीत निधी जिल्हा स्तरावरील कार्यक्रम आयोजनास खर्च करण्यांसाठी सभेत सर्वानुमते मंजुरी प्रदान करणेत आली.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्र १७- नैसर्गिक /आकस्मिकरीत्या भात गंजीला लागलेल्या आगीस प्रोत्साहनपर अनुदान देणे.**

**ठराव क्र १७-** सन २०१८-१९ या चालु वितीय वर्षात जिल्हा निधी अंदाज पत्रकात विषयांकीत बाबीवर रु.५.०० लक्षची तरतुद उपलब्ध असून, सदर तरतुदी मधुन ज्या शेतकऱ्यांचे भात गंजीस नैसर्गिक /आकस्मिक रित्या आग लागल्यास, अशा बाधीत शेतकऱ्यास रुपये ७५००/- प्रति हेक्टर प्रमाणे दोन हेक्टर चे मार्यादेत सानुग्रह मदत देण्याचे प्रस्तावित आहे. विषयांकित योजनेवर समिती सभेत सविस्तर पुर्वक चर्चा करण्यात येवून योजना राबविणे व त्यावर होण्याऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रं १८- नैसर्गिक वा आकस्मिकरीत्या जनावरांच्या गोठयाला लागलेल्या आगीस प्रोत्साहनपरअनुदान देणेबाबत.**

**ठराव क्रं.१८ -**शेतकऱ्यांच्या घराशेजारीच लागुन असलेल्यावा शेतावरील जनावरांच्या गोठयामध्ये, शेतकरी दरवर्षी जनावरांना लागणारा चारा व शेती सामुग्री भरुन ठेवत असतो,अश्या गोठयाला नैसर्गीक वा आकस्मिकरिक रित्या आग लागल्यास त्यातील जनावरे बाधीत होवु शकतात तसेच त्यातील ,चारा व शेती सामुग्री नष्ट होते त्यामुळे बाधीत शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवते अशा परिस्थीतीतुन शेतकऱ्यांस सावरण्यासाठी जिल्हयनिधी योजनेत सदर बाबीवर रु.१.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली असुन बाधीत शेतकऱ्यास रु.४०००/- चे सानुग्रह मदत देण्याबाबत सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रं १९- नैसर्गीक आपत्ती ,पुर, विज वा सर्पदंश ई. कारणामुळे शेतकऱ्याचा मृत्यु झाल्यास त्यांचे वारसदारास सानुग्रह मदत देणेबाबत.**

**विषय क्रं १९-** शेतकरी हा स्वतः त्याचे घरातील कर्ता पुरुष असल्याने त्यांचे आकस्मिक पणे नमुद कारणामुळे मृत्यु झााल्यास त्यांचे कुटूंबियावर फार मोठे संकट येत असते अशा परिस्थीतील त्याचे कुटूंबास तातपुरत्या स्वरुपाात मदतीचा आधार म्हणुन जिल्हा निधी अंदाजपत्रकात रु. १.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली असुन, सदर तरतुदीमधुन आकस्मिकरित्या मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांचे कुटूंबातील वारसानास रु.१५०००/- ची सानुग्रह मदत देण्यासाठी सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली .

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २०- कृषि विभागासाठी वाहन भाडयाने घेणे**

**ठराव क्रमांक २०-** जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाकडील सर्व योजना तसेच कृषि निविष्ठा गुणवत्ता नियंत्रण वेळेत व हंगामातच पार पाडण्यांसाठी वाहना अभावी विलंबाने कार्ये पार पडत होती. त्यांत शेतकऱ्यांकडून कृषि निविष्ठांबद्दलच्या तक्रारी वेळेत निकाली निघत नव्हत्या तद्वतच शेतकऱ्यांना माहीती अभावी लाभ होत नव्हता. त्याप्रमाणे विभागाद्वारे पंचायत समिती स्तरावरुन राबविण्यांत येणाऱ्या योजनांची नियमाप्रमाणे अंमलबजावणी होत आहे किंवा कसे ? यांची वेळोवेळी तपासणी करणेसाठी शेतकऱ्यांना भेटी देणे इ. करीता जिल्हा परिषदेच्या सन २०१८-१९ अंदाजपत्रकात कृषि विभागासाठी वाहन भाडयाने घेणे करीता रु. ४.०० लक्षची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आलेली असून, याकरीता असलेल्या शासन नियमाप्रमाणे विभागाने खाजगी वाहन भाडयाने घेणेची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरविण्यांत आले.

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २१ - मा.अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय**

**विषय क्रमांक २१/१- जिल्हानिधी/ मीरची पिक योजना लाभार्थींची निवड प.स. स्तरावर करण्याबाबत**

**ठराव क्रमांक २१/१-** सन २०१८-१९ मध्ये जिल्हानिधी/ मीरची पिक योजना लाभार्थीचे अर्ज व प्रस्ताव प.स. स्तरावर घेवून त्याची छाननी करण्यात यावी. व वेळे अभावी योग्य लाभार्थीचे निवड प.स. स्तरावर करण्यात यावे व मंजुर यादीची प्रत कृषि विभागाकडे सादर करावी. असे सभेत चर्चा करून ठरावास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली .

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**विषय क्रमांक २१/२- जिल्हानिधीतील DBT नुसार साहित्स खरेदी करण्यास कॅशलेस ची अट शितील करण्याबाबत ठराव क्रमांक २१/२-** सन २०१८-१९ या वर्षात जिल्हानिधी योजनेतंर्गत लाभार्थीना विविध शेती साहित्या DBT नुसार खरेदी करण्याचा सुचना मागील वर्षापासून प्राप्त झाल्या आहेत. कृषि विभागाच्या मार्गदर्शक सुचनानुसार शेती साहित्य खरेदी करतांना कॅशलेस पदधतीचा वापर करण्याचा सुचना आहेत. जेणेकरून सदर योजनेत खोटी बिले सादर करून योजनेचा गैरफायदा घेणार नाही. पंरतु पंचायत समीती स्तरावरुन याबाबत विविध प्रकारच्या अडचणी लाभार्थीना होत असल्याबाबत अभिप्राय अधिकाऱ्यामार्फत प्राप्त झाले. जसे बऱ्याच शेतकऱ्यांकडे चेकबुक, ATM कार्ड उपलब्ध नाही व काही लाभार्थी शेतकरी अशिक्षित असल्याने या योजनेत त्यांना लाभ घेता येणे शक्य होत नाही. करिता जिल्हानिधी योजनेतंर्गत विविध शेती साहित्य लाभार्थीने रोखीने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली व योजनेमध्ये कोणीही खोटी बिले सादर करून गैरप्रकार होऊ नये यासाठी पंचायत समीती स्तरावरील प्राप्त बिले व लाभार्थींनी खरेदी केलेले साहित्याची १००% तपासनी अधिकाऱ्यांनी करून अनुदानाची अदायगी करण्याबाबत सुचना देण्यात आली व वरीलप्रमाणे योजना ठरावास सर्वानुमते मंजुरी प्रदान करण्यात आली

**ठराव सर्वानुमते मंजुर**

सभेस उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्ष महोदयाचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| सदस्य सचिव | अध्यक्ष कृषि समिती तथा |
| कृषि समिती तथा | सभापती |
| कृषि विकास अधिकारी, | कृषि समिती |
| जिल्हा परिषद, गोदिया | जिल्हा परिषद, गोदिया |

**कृषि समिती सभा जिल्हा परिषद,गोदिया**
**दिनांक १८/०५/२०१८ सभेचे कार्यवृत्त**

दिनांक १८/०५/२०१८ ला दु. १२.०० वाजता सन्मा. सौ. शैलजा कमलेश सोनवाने सभापती कृषि समिती जिल्हा परिषद गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला सभेचे रजिस्टर मध्ये स्वाक्षरी असलेले सन्मा. समिती सदस्य/अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत केले व सभेला सुरुवात करण्यांत आली.

**विषय क्र.१- मागील सभेचे कार्यवृत्त मंजुर व कायम करणे**
**ठराव क्र.१-** दिनांक २०/०४/२०१८ रोजी झालेल्या कृषि समिती सभेच्या कार्यवृत्ताच्या प्रति मा. अध्यक्ष व सन्मा. समिती सदस्यांना देवून त्यांचे वाचन करण्यांत आले.

**विषय क्र. -२ शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे**
**ठराव क्र.-२-** शासनाकडुन योजनाविषयक कोणतेही परिपत्रक व शासन निर्णय प्राप्त झालेले नसल्याने वाचन करता आले नाही.

**विषय क्र. -३ विविध योजना विषयक आढावा**
**ठराव क्र.- ३-** सन २०१७-१८ मध्ये राबविण्यात आलेल्या जिल्हा निधी योजने अंतर्गत योजनेची माहीती तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबण योजना व बिरसा मुंडा कृषि क्राती योजने विषयक सभेत माहिती देण्यात आले.

सभेस उपस्थित पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानुन मा. अध्यक्ष महोदयाचे परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

स्वा/-
सदस्य सचिव
कृषि समिती तथा
कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, गोदिया

स्वा/-
अध्यक्ष कृषि समिती तथा
सभापती
कृषि समिती
जिल्हा परिषद, गोदिया